नियमित दिवाणी दावा २०/२०१९
धोंडीराम रामा तोडकर वि. अशोक आण्णाप्पा तोडकर वगैरे
नि.नं. ९९/लगत

**प्रतिवादी क्र. १, ७,८ तर्फे श्री. आर.बी.पाटील वकील यांच्या मार्फत उलटतपास शपथेवर सुरु,**

५. हे म्हणणे खरे आहे की, मी आजरोजी जबाब हा धोंडीराम रामा तोडकर व बापू रामा तोडकर यांचे करिता देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, धोंडीराम तोडकर हे माझे वडील आहेत. मी प्रस्तुत दावा वाचलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, धोंडीराम तोडकर यांचेसोबत मी प्रत्येक तारखेस कोर्टात हजर असतो. हे म्हणणे खरे नाही की, धोंडीराम तोडकर यांच्या उलटतपासाच्या दिवशी मी हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यात कथन करत असलेल्या खरेदी पत्राचा क्रमांक मी नमूद केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या दाव्यात खरेदी पत्राचा क्रमांक नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील नमूद खरेदी पत्र हे १९८९ सालचे होते. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८९ मध्ये खरेदी पत्र झाल्यानंतर प्रतिवादी क्र. ७ व ८ यांचे नाव सातबारा पत्रकी नोंदविण्यात आले.हे म्हणणे खरे नाही की, सन १९८९ मध्ये झालेले खरेदीपत्रक माझ्या वडिलांना व चुलत्यांना माहित होते. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीपत्र झाले तेव्हा माझे वय अंदाजे ५ ते ६ वर्षे होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दावा दाखल करेपर्यंत माझे वडिलांनी प्रतिवादी क्र. ७, ८ यांचे नाव सातबारा पत्रकी लागल्याबाबत तक्रार उभारली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीपत्रापासून निम्म्या जमिनीमध्ये प्रतिवादी क्र. १ व निम्म्या जमिनीमध्ये प्रतिवादी क्र. ७ व ८ यांची वहिवाट होती. हे म्हणणे खरे नाही की, कोंडीबा तोडकर यांचे नावे संपूर्ण जमिनीचे खाते झाल्याबाबत पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोंडीबा तोडकर यांचे नावे एकत्र कुटुंब प्रमुख म्हणून खाते झाल्याबाबतचा पुरावा या कामी मी हजर केलेला नाही. मी या कामी फेरफार हजर केला आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी या कामी सातबारा उतारे व शेत पुस्तक हजर केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.

२२.०१.२०१९ रोजी आम्हाला खरेदीपत्राची माहिती झाल्याचे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, दि. २२.०१.२०१९ रोजी माहिती झाल्याबाबत मी दाव्यात नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि. २२.०१.२०१९ रोजी माझ्या वडिलांचा व चुलत्यांची कब्जेवहिवाट नसल्यामुळे मी दावा मिळकतीमध्ये हरकत प्रतिवादी यांनी केल्याचे खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ७ व ८ यांनी केलेला खरेदी व्यवहार पुर्णपणे कायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांना मदत करण्याच्या हेतूने आजरोजी मी खोटा जबाब देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

दि. १०/०६/२०२५.

**( के. दि. काकतकर )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

पन्हाळा